**ठळक बातम्या**

- मुंबईत उपनगरी रेल्वे गाडीतून प्रवास करताना गेल्या तीन वर्षांत साडेसात हजारपेक्षा जास्त जणांचा जीव गेला असून त्याबाबत उपाययोजना विचाराधीन असल्याचं परिवहन मंत्र्यांचं विधानसभेत आश्वासन

- शिवसेना आणि रिपब्लिकन सेनेची युती जाहीर

- तेलंगण सीमा भागातली वादग्रस्त १४ गावं लवकरच चंद्रपूर जिल्ह्यात समाविष्ट होणार

- संसद अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर येत्या रविवारी केंद्र सरकारने बोलावली सर्वपक्षीय बैठक

**आणि**

- 'केसरी'चे विश्वस्त संपादक आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपती डॉ. दीपक टिळक यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार

**<><><><><>**

मुंबईत उपनगरी रेल्वे गाडीतून प्रवास करताना गेल्या तीन वर्षांत साडेसात हजार पेक्षा जास्त जणांचा जीव गेला असून सुमारे ७ हजार३०० जण जखमी झाले असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज विधानसभेत दिली. गेल्या महिन्यात मुंब्रा-कळवा स्थानकांदरम्यान दोन लोकलमधले प्रवासी एकमेकांना धडकून झालेल्या अपघाताबद्दल आमदार अतुल भातखळकर यांनी लक्षवेधी मांडली होती. सरकारी कार्यालयांप्रमाणेच खासगी आस्थापनांच्या वेळेत बदल करून लोकलवरचा भार कमी कसा करता येईल, याचा अभ्यास करण्यासाठी टास्क फोर्स स्थापन करू, असं आश्वासन सरनाईक यांनी यावेळी दिलं. लोकलची

संख्या वाढवून लोकल गाड्यांना बंद होणारे दरवाजे लावण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याशी सकारात्मक चर्चा सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. मुंबई मेट्रोपोलिटन क्षेत्रात मेट्रोचं जाळं वाढल्यामुळे लोकलवरचा भार कमी होईल अशी अपेक्षा होती, मात्र या भागातल्या वाढत्या लोकसंख्येमुळे तसं चित्र दिसत नाही, असं ते म्हणाले. पॉड टॅक्सी, मेट्रो, जलवाहतूक असे वाहतुकीचे इतर पर्याय वेगाने उपलब्ध करून देण्याचं काम सुरू आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली. काँग्रेस आमदार नाना पटोले यांनी, हे पर्याय काल्पनिक असून लोकलची दारं बंद केल्यास गर्दीत प्रवाशांसाठी ते धोकादायक ठरेल, अशी टीका केली. त्यावर सरनाईक यांनी रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेसाठी सरकार वचनबद्ध असल्याची ग्वाही दिली.

**<><><><><>**

शेजारी राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात वीज दर कमी असून शेतकऱ्यांना सौर वीज घेण्याची सक्ती नाही मात्र, त्यांच्या सौर ऊर्जेशी संबंधित अडचणी समजून घेऊन त्यावर प्राधान्याने उपाय शोधले जात आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात प्रश्नोत्तराच्या तासाला दिली. वीज दरवाढीचा प्रश्न अभिजीत वंजारी यांनी उपस्थित केला होता. पूर्वीच्या काळात शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सोलर बूस्टर पंप पेक्षा, आता दिले जाणारे पंप अधिक सक्षम आहेत, असं सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, सोलर पंपसंबंधी शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी पोर्टल कार्यरत. तरीही एखाद्या ठिकाणी अडचणी कायम असल्या तर तेथील शेतकऱ्यांना, सौर ऊर्जे ऐवजी पारंपरिक वीज देण्याचा विचार करु, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.

**<><><><><>**

हरवलेल्या लहान मुलांचा शोध घेण्यासाठी राबवण्यात येणाऱ्या ऑपरेशन मुस्कानअंतर्गत आत्तापर्यंत ४१ हजार १९३ लहान मुलांचा, तर ऑपरेशन

शोधअंतर्गत गेल्या वर्षी १७ एप्रिल ते १५ मार्च या कालावधीत ४ हजार ९६० महिला सापडल्या असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानपरिषदेत सांगितलं. आमदार सुनील शिंदे यांनी विचारलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते. बेपत्ता झाल्याच्या प्रकरणांमध्ये अनेक वेळा अशा प्रकरणांचा तपास मागे पडू नये यासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यात शोध कक्ष स्थापन करण्यात आले आहेत, असंही फडणवीस म्हणाले. केंद्र सरकारच्या Missing Portalशी सगळ्या राज्यांना जोडण्यात आलं असल्याचंही ते म्हणाले. यावर, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी, याकडे सामाजिक जबाबदारी म्हणून पाहण्याची गरज अधोरेखित केली.

<><><><><>

शिवसेना आणि रिपब्लिकन सेनेची युती झाल्याची घोषणा शिवसेना नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांनी आज केली. मुंबई इथे झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत या युतीची घोषणा करण्यात आली. गेल्या अडीच वर्षांत सामान्य माणसासाठी तसंच गोरगरीब, शोषित आणि वंचितांसाठी आपल्या सरकारने विविध योजना सुरू केल्याचं एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. आपल्या सरकारने केलेलं काम पटल्यामुळेच रिपब्लिक सेना आपल्याबरोबर असल्याचंही शिंदे यावेळी म्हणाले.

दोन्ही पक्षांची युती ही बाबासाहेब आंबेडकर आणि प्रबोधनकार ठाकरे यांच्यापासून चालत आली आहे. कोणत्याही अटी शर्तींशिवाय ही युती होत असून आंबेडकरी कार्यकर्त्यांना सत्तेत सामावून घ्यावं, अशी विनंती आपण शिंदे यांना केल्याची प्रतिक्रिया आनंदराज आंबेडकर यांनी यावेळी दिली.

<><><><><>

महाराष्ट्र-तेलंगणा सीमावादात अडकलेली जिवती तालुक्यातील १४ मराठी गावं लवकरच महाराष्ट्रात समाविष्ट होणार आहेत. ही १४ गावं चंद्रपूर जिल्ह्यात येणार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत स्पष्ट निर्देश दिले आहेत ,

यावर अंतिम निर्णय लवकरच घेण्यात येईल, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. विधानभवनातील दालनात झालेल्या बैठकीत ते बोलत होते.....

**होल्ड - बाईट- बावनकुळे (४२ सेकंद)**

**<><><><><>**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनापूर्वी रविवारी केंद्रसरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. या बैठकीत, संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज सुरळीत चालावं यासाठी सर्व पक्षांकडून सहकार्याचं आवाहन सरकार करेल. संसदेचं पावसाळी अधिवेशन येत्या सोमवारी, २१ जुलैपासून सुरु होणार असून ते येत्या २१ ऑगस्टपर्यंत चालेल.

अधिवेशनादरम्यान अनेक महत्त्वाच्या विधेयकांवर चर्चा होऊन ती मंजूर होण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

केंद्रसरकारच्या प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजनेच्या अंमलबजावणीला केंद्रीय मंत्रिमंडळाने आज मंजुरी दिली. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर पत्रकारपरिषदेत ही माहिती दिली. पुढची ६ वर्षं देशातल्या १०० आकांक्षित जिल्ह्यांमधे ही योजना राबवण्यात येईल.

**<><><><><>**

सागरी व्यापार आणि नौकानयन अर्थव्यवस्था संधी आणि समृद्धीचा पूल बनावी यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. ते आज 'महाराष्ट्र मेरीटाईम परिषदेचं उद्धाटन केल्यावर बोलत होते. मुंबई आणि कोकण किनारपट्टीला समुद्र मार्गाने होणाऱ्या व्यापाराचा इतिहास आहे. आणि आपण त्याच व्यापाराला एका नव्या मेरिटाईम धोरणाची जोड देत आहोत, असंही

मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. या परिषदेच्या उद्घाटनावेळी राज्याचे बंदरविकास मंत्री नितेश राणे उपस्थित होते.

<><><><><>

शाळांना विद्यार्थ्यांच्या निरोगी जीवनशैलीसाठी शाळांमधे तेल मंडळाची स्थापना करण्याचे आदेश सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने दिले आहेत. पौष्टिक अन्न आणि व्यायामावर भर देणारे उपक्रम राबवण्याचे निर्देशही सीबीएसईने शाळांना लिहिलेल्या पत्रात दिले आहेत. तसंच, शाळांमध्ये जिन्यांचा वापर, दोन तासांमध्ये छोटी व्यायामाची विश्रांती आणि चालण्याच्या व्यायामाचा समावेश वेळापत्रकांमध्ये करण्याचे आदेश दिले आहेत.

<><><><><>

लोकमान्य टिळक यांचे पणतू, 'केसरी'चे विश्वस्त संपादक आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपती डॉ. दीपक टिळक यांचं आज पहाटे पुण्यात निधन झालं, ते ७२ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर आज वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. अनेक मान्यवरांनी यावेळी उपस्थित राहून त्यांना आदरांजली वाहिली.

दीपक टिळक यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी दुःख व्यक्त केलं आहे.

<><><><><>

जपानच्या खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत आज भारताने चांगली सुरुवात केली. टोकियो इथे सुरु असलेल्या या स्पर्धेत पुरुष दुहेरी गटात भारताच्या सात्विकसाईराज रांकिरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी तर एकेरी गटात लक्ष्य सेन यांनी दमदार कामगिरी करत दुसऱ्या फेरीत प्रवेश मिळवला. सात्विक साईराज आणि चिराग या जोडीनं दक्षिण कोरियाच्या कांग मिन हुक आणि किम डाँग यांचा पराभव करत शुभारंभाच्या सामन्यात जागतिक पातळीवरचं १५ वं स्थान

पटकावलं. लक्ष्य सेन याने देखील चीनच्या वांग झेन्ग झिंग याचा पराभव केला. मात्र, दोन वेळा ऑलिम्पिक पदक मिळवलेल्या पीव्ही सिंधू हिला पराभवाला सामोरं जावं लागलं.

**<><><><><>**

**रत्नागिरी** जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाचा जोर आज ओसरला आहे. त्यामुळे नद्यांची पाणीपातळीही कालच्या तुलनेत ओसरली असून, आज सकाळच्या स्थितीनुसार, फक्त खेडमधली जगबुडी नदी इशारा पातळीच्या वरून वाहत आहे.

**रायगड** जिल्ह्यात आजही पावसाचा जोर असून कुंडलिका नदी धोक्याच्या पातळीवरुन वाहत आहे.

**राजधानी मुंबईत** आज पावसानं काहीशी विश्रांती घेतली आहे.

**//<><><><><>//**